OTH - 36

# कुंभी कासारी सहकारी बँक लि., कुडित्रे.

R.B.I. Licence No.: UBD/MAH/1652-P Dt. 27th Oct. 1998

जावक क्र.४६ /२४० /२१-२२ दिनांक : ११.१०.२०२१

प्रति,

अकौंटस् अधिकारी /शाखाधिकारी

प्रधान कार्यालय / शाखा:-

## लॉकर सेवेबाबतचे धोरण

**प्रस्तावना** -भारतीय रिझर्व बँकेचे दि.१८.०८.२०२१ चे ' लॉकर सेवेबाबत ' चे परिपत्रक संचालक मंडळ सभा दि.२४.०८.२०२१ ठराव नं.११ अन्वये सभेत वाचून दाखवले त्याप्रमाणे खालीलप्रमाणे धोरण ठरविणेत आले.

**अंमल**-सदरचे धोरण दि.०१.०१.२०२२ पासून लागू राहील.

**ग्राहक**- लॉकर सेवा धारकांची पूर्ण चौकशी करून त्यांची केवायसी पुर्तता असली पाहिजे. व बँकेकडे इतर कोणतीही सेवा घेत नसेल तरीही ही सेवा देणेत येईल.

**लॉकर सेवा करार** - बँक व लॉकर धारकामध्ये करार केला जाईल त्यामध्ये लॉकरधारक कोणतेही बेकायदेशीर /ज्वालाग्राही वस्तू ठेवणार नाही.अन्यथा बँक कारवाई करेल असे नमुद असेल . दि.०१.०१.२०२३ पासून सदर करारपत्राची एक प्रत लॉकरधारकांना देणेत येईल.सदरचा करार आयबीए ने प्रमाणित केलेप्रमाणे असेल.लॉकरधारक व त्याच्या वटमुखत्यार यांनी पासपोर्ट साईज फोटो देणे आवश्यक आहे.

**लॉकर भाडे**- लॉकरधारक जर लॉकर भाडे नियमित देत नसेल व लॉकर वापर करीत नसेल तर त्याच्याकडून ३ वर्षाचे भाडे रक्कम व लॉकर चावी बदलणेचा खर्च अशी एकूण रक्कम रूपये (लहान लॉकर -१५००+२०००, मध्यम लॉकर -३०००+२००० व मोठा लॉकर ६०००+२०००)अशी मुदतबंद ठेव म्हणून घेणेत येईल व लॉकर बंद करताना सदर ठेव परत केली जाईल.

शाखा स्थलांतर करणेचे झालेस संबंधित लॉकरधारकांना आगाऊ नोटीस दिली जाईल.

**लॉकर सुरक्षितता**- लॉकर्स त्रयस्थ व्यक्तीकडून फोडू शकणार नाही तसेच पाऊस, आग, पूरापासून धोका होणार नाही याची बँक काळजी घेईल.तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही सुविधा ठेवेल.व सदर सीसीटीव्ही मधील मेमरी १८० दिवसापर्यंत साठवेल.सदर अद्यावत लॉकर सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले जाईल.

लॉकर्स हे स्टॅन्डर्ड (BIC) ब्युरो ऑफ इंडियन स्टॅन्डर्ड ने प्रमाणित केले असावेत.तसेच लॉकरच्या चावीवर बँकेचे नांव /शाखा किंवा त्या बँक / शाखेचे किचेन लावेल.

**लॉकर व्यवहार** - सदरचे व्यवहार करणेचे लॉकर सेवा धारक व त्या वटमुखत्यार यांना परवानगी असेल त्यांच्या भेटीचे रेकॉर्ड ठेवले जाईल.व बँक अधिकारी यांनी मास्टर की ऑपरेट केल्यानंतर संबंधित लॉकरधारक आपल्या चावीने लॉकर उघडून व्यवहार करेल.लॉकर ऑपरेट केलेनंतर लॉकर धारकांस एस्एम्एस् पाठविला जाईल.

**अंतर्गत नियंत्रण** - रिकाम्या लॉकर्सच्या चाव्या ह्या शाखाधिकारी यांचेकडे सीलबंद राहतील. मास्टर की (डुप्लीकेट) इतर बँकेच्या लॉकर्स मध्ये ठेवली जाईल.सीबीएस् मध्ये लॉकर्स रजिस्टर / की रजिस्टर ठेवले जाईल. लॉकर व्यवस्थित बंद केले की नाही हे शाखेतील अधिकारी / शाखाधिकारी शाखा बंद करताना पाहणी करतील जर व्यवस्थित बंद केले नाही तर संबंधित लॉकर धारकास कळविले जाईल.

**नामनिर्देशन**(Nominee)-लॉकर धारकांना आपल्या पश्चात लॉकर व्यवहार करणेसाठी 4S-ZC व 4S-ZF प्रमाणे नॉमिनी नेमता येईल.लॉकर धारकाचा मृत्यू झालेस पश्चात वारसाने (नॉमिनीने)अर्ज दिल्यानंतर १५ दिवसांत सदर अर्ज क्लेम मंजूर केला जाईल.

**लॉकर सेवा बंद करणे /लॉकर ब्रेक करणे**-लॉकर धारकाने किल्ली हरवलेस व त्याने अर्ज देऊन खर्च नुकसान भरपाई केलेस अगर सरकारी विभाग/कोर्टाकडून ऑर्डर आलेस लॉकर ब्रेक पंचाच्या साक्षीने केला जाईल.व त्याचा रितसर पंचनामा केला जाईल.लॉकर धारक जर ३ वर्षापर्यंत भाडे देत नसेल अगर वापरत नसेल तर त्यांना नोटीस पाठवून सेवा बंद केली जाईल.

**बँकेची जबाबदारी-** नैसर्गिक आपत्ती अगर लॉकर धारकाच्या निष्काळजीपणामुळे होणाऱ्या घटनेस बँक जबाबदार राहणार नाही मात्र बँकेच्या निष्काळजीपणा , चोरी, पुर, आग,डाका, बँक कर्मचारी गैरव्यवहाराने लॉकरला इजा पोहोचलेस बँक जबाबदार राहील.लॉकरमधील वस्तूचा विमा बँक करीत नाही.

सेवेचे सर्व नियम /करार नमुना / क्लेम सेटलमेंट इ. माहिती शाखेकडे/ वेबसाईटवर प्रसिध्द केले जाईल.

KASARI SAHAKARI BANK LTD. HEAD OFFICE KUDITRE

मुख्य कार्यकारी अधिकारी